**काडीची पूर्वतयारी :** लागवडीपूर्वी काडी १५-२० मिनिटे आधी पाण्यातून बाहेर काढल्यास काडीवरील पाणी पूर्णपणे गळून जाईल. या काडीला तळातील बाजूस कात्रीच्या सहाय्याने तिरपा काप घेऊन २००० पीपीएमचे आयबीएच्या द्रावणात ६० सेंकद बुडवून घ्यावी. ही काडी नंतर दोन डोळे मातीमध्ये व २ डोळे जमीनीच्यावर राहील अशाप्रकारे पिशवीमध्ये लाऊन पाणी द्यावे. लागवडीनंतर ही काडी साधारण वातावरणात (तापमान ३०-३५ सें.ग्रे. व ८०% च्या पुढे आर्द्रता) ७-८ दिवसात फूटायला सुरवात होते.

**३) रोपांची काळजी व व्यवस्थापन :** खुंटकाडीची पिशवीमध्ये तसेच जमीनीत लागवड केल्यानंतर कमी प्रमाणात परंतु नेहमी पाणी देणे गरजेचे असते. यामुळे फूटण्याकरीता पाण्याची पूर्तता होईल व आवश्यक असलेली आर्द्रता निर्माण होईल. सुरवातीच्या काळात डोळे फुटल्यानंतर नवीन फूटींवर उडद्या, चाफर बिटल व कॅटरपिलरचा प्रादुर्भाव जाणवतो. किटकनाशकांची फवारणी शिफारशीप्रमाणे करून किड नियंत्रणात ठेवावी.

एकदा सर्व डोळे फुटून ४-५ पानांची फूट झाल्यास खुंटरोपांची नर्सरीमध्ये चांगल्याप्रकारे वाढ होण्याच्या दृष्टीने नत्राची उपलब्धता करावी.



रोपवाटीकाचे दृश्य



पिशवीमध्ये तयार झालेली रोपे




रोपवाटीकेतील डॉगरीज रूटस्टॉक

विस्तार माहिती पत्रिका क्रं. : ३३

तांत्रिक माहिती :
डॉ. आर. जी. सोमकुंवर, प्रविण बी. तावरे, डॉ. ए. के. उपाध्याय आणि पी. जी. अडसूळे
राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे - ४१२ ३०७

प्रकाशक :
डॉ. पी. जी. अडसूळे, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे - ४१२ ३०७

जानेवारी : २०१० किमंत : रू. १०

अधिक माहितीकरता संपर्क :
संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र
पो. बॉ. क्रं. ३, मांजरी फार्म पोस्ट, सोलापूर रोड, पुणे-४१२ ३०७. महाराष्ट्र (भारत)
फोन : ०२०-२६९१४२४५/५५७३/५५७४
फॅक्स : ०२०-२६९१४२४६
ईमेल : dirnrcg@gmail.com • वेबसाईट : http://nrcgrape.nic.in

Printed at : Flamingo Business Systems, Tel. : 24214636. Email : flaminbs@vsnl.com

Extension Folder No. 33

भाकृअनुप
ICAR

# द्राक्षरोपवाटीका तयार करणे



रा.द्रा.सं.के.
NRCG

**राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र, पुणे**
पो. बॉ. नं. 3, मांजरी फार्म पो. ऑ., सोलापूर रोड,
पुणे - 412 307. महाराष्ट्र (भारत)

महाराष्ट्र राज्य द्राक्ष उत्पादनात अग्रेसर असून अंदाजे ४५,००० क्षेत्र द्राक्ष लागवडीखाली आहे. निर्यातक्षम प्रतीचे द्राक्ष उत्पादन राज्यातुन बऱ्यापैकी होते. चांगल्या दर्जाचे द्राक्ष उत्पादन करण्याच्या दृष्टीने उच्च प्रतीच्या रोपांची निवड करणे महत्वाचे असते. म्हणूनच, द्राक्षबाग व्यवस्थापनात रोपवाटीकेला महत्त्व देणे गरजेचे आहे. जे पेरले तेच उगवले या म्हणीचा विचार करता द्राक्षबागेत प्रति वर्ग क्षेत्रफळातून निर्यातक्षम प्रतीची रोग व किडमुक्त तसेच जास्त साठवणूक क्षमता असणारी द्राक्षे तयार करण्याच्या दृष्टीने द्राक्ष रोपांना जास्त महत्त्व दिले पाहिजे.

**आदर्श रोपवाटिका तंत्रज्ञान :** रोपवाटीकेमध्ये आवश्यक त्या गरजा पूर्ण करून चांगल्या दर्जाची, रोग व किडमुक्त नर्सरी रोपे तयार करण्याच्या प्रक्रियेला आदर्श रोपवाटीका तंत्रज्ञान म्हटले जाते.

**आदर्श रोपवाटीका तयार करण्याकरीता खालील गोष्टी महत्त्वाच्या आहेत**

१. मातृवृक्षाची लागवड व व्यववस्थापन

२. रोपवाटीकेमध्ये रोपे तयार करणे

३. रोपांची काळजी व व्यवस्थापन

**१. मातृवृक्षाची लागवड व व्यवस्थापन :** मातृवृक्षाची लागवड ही द्राक्षबागेपासून दूर असावी. तारेचे कुंपण पूर्ण प्लॉटच्या भोवती ठेवण्याला प्राधान्य द्यावे. यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांचा व जनावरांचा त्रास वाचेल. या प्लॉटमध्ये फाऊंडेशन या वर्गातील रोपे फक्त लागवडीकरीता निवडावीत. रोग (मुख्यत:विषाणू) व किडमुक्त चांगले उत्पादन देणाऱ्या मातृवृक्षापासून निवडलेली काडी असावी. ती काडी विषाणू रोगांकरीता परिक्षण असलेली तसेच रोपांच्या शुद्धतेकरीता आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजना केलेली असावी.

शक्यतोवर मातृवृक्षाची लागवड ही सेंद्रिय शेती पध्दतीने करावी. मातृवृक्षाची लागवड केली आहे अशा जमीनीची सुपीकता टिकवून ठेवण्याकरीता १० टन कुजलेले शेणखत व १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट प्रति एकर प्रमाणे वर्षातून दोनवेळा (मार्च व सप्टेंबर) टाकावे. त्याचसोबत या बागेत मातृवृक्षाची वाढ चांगली होण्याच्या दृष्टीने युरीया व सल्फेट ऑफ पोटॅश १०० कि.ग्रॅ. प्रति एकर जवळपास ४-५ एकसारख्या मात्रेमध्ये द्यावेत. फेब्रुवारी-सप्टेंबर या कालावधीत सोबतच थोडेफार सुक्ष्म अन्नद्रव्य टाकून पूर्तता करावी.

मातृवृक्षवेलीस वळण देणे महत्वाचे असते. यामुळे वेलीची वाढ अपेक्षेप्रमाणे होते व काड्यांच्या संख्येत वाढ करून घेता येते. वेलीच्या वाढीच्या जोमानुसार वळण पध्दत ठरवावी. मातृवृक्षवेलीला वळण देण्याकरीता साधारणत: T किंवा निफिन पद्धत वापरात आणली जाते. अशा प्रकारच्या वळण पद्धतीमध्ये काड्यांची रचना व्यवस्थित होऊन प्रत्येक काडी सुर्यप्रकाशाच्या सान्निध्यात येईल व त्याचाच फायदा म्हणजे काडीमध्ये भरपूर अन्नद्रव्य तयार होईल.


खुंटरोपांचा मदर ब्लॉक

कधी कधी वेलीचा वाढीचा जोम जास्त असतो. त्यामुळे काडीवरील दोन पेण्यातील अंतर वाढते. अशा परिस्थितीत सीसीसीची ७५०-१००० पीपीएम ने फवारणी केल्यास वाढ नियंत्रणात राहुन काडी परिपक्व होईल. जमीनीचा पोत व वातावरणातील तापमानाचा विचार करून वेलीला पाण्याची उपलब्धता करून द्यावी.

**२) रोपवाटीकेमध्ये रोपे तयार करणे :** रोपवाटीकेमध्ये रोपे दोन पध्दतीने तयार केली जातात.

**अ) गादीवाफ्यावर लागवड करणे :** गादीवाफा तयार करण्याकरिता जमीन आधी नांगरून घ्यावी. यामध्ये १० टन कुजलेले शेणखत प्रति एकर प्रमाणे टाकून व्यवस्थित मिसळवून घ्यावे. वाफ्याची उंची ही साधारणत: १० सें.मी. तसेच आकार हा १.२५ मि. रूंद व ३-४ मि. लांब असा असावा. लागवडीपूर्वी गादी वाफ्यात भरपूर पाणी द्यावे. निघालेल्या गवताचा नायनाट करण्याकरिता आवश्यक त्या तणनाशकांची फवारणी करावी. या वाफ्यावर ८-१० मि.मी. जाडीची परिपक्व झालेली चार डोळ्यांची काडी २००० पीपीएम आयबीए च्या द्रावणात बुडवून लाऊन घ्यावी.


गादी वाफा

**ब) पिशवीत रोपे तयार करणे :** लागवडीकरिता ५-६ महिने जुनी रोपे आवश्यक समजली जातात. ही रोपे तयार करण्याकरिता ५ इंच × ७ इंच आकाराची पिशवी पुरेशी असते. परंतु, पिशवीचा आकार हा ४ इंच × ६ इंच पेक्षा कमी नसावा. जर रोपे दूर अंतरावर वाहतूक करून न्यावयाची असल्यास वाहतुकीच्या साधनाचे व्यवस्थापन सोईने करता येते. पिशवी ही ५०-१०० मायक्रॉन जाडीची असून घडी करता येईल अशा प्रकारची असावी. पिशवीला ५ मिमी आकाराची ७-८ छिद्रे पाडून घ्यावीत यामुळे आवश्यकतेपेक्षा जास्त दिले गेलेले पाणी बाहेर निघुन जाईल. या पिशवीमध्ये माती : शेणखत : वाळू (२:१:१) या प्रमाणात तसेच १ ग्रॅम/कि.ग्रॅ. किटकनाशकाची भुकटी मिसळवून पिशवी भरून घ्यावी. यामुळे भविष्यात वाळवी या किडीपासून बचाव करता येईल.


वाफ्यात रोपे ठेवणे

**पिशवी वाफ्यात ठेवणे :** पिशवीमध्ये योग्य मातीचे मिश्रण टाकल्यानंतर प्रत्येक पिशवी तयार केलेल्या वाफ्यात ठेवावी. वाफ्याची लांबी ही ५ फूट व रूंदी ३ फूट पेक्षा जास्त नसावी.

**क) काडीची पूर्व तयारी व लागवड :** मागील हंगामातील परिपक्व झालेली ८-१० मि.मी. जाड अशी ४ डोळे असलेली काडी चित्रात दिल्याप्रमाणे तयार करावी. यामधून ४०-५० काड्या एकत्र ठेऊन सुतळीने बंडल बांधुन घ्याव्यात. या काड्यांचे बंडल २४ तास वाहत्या पाण्यात राहतील अशा प्रकारे नियोजन करावे. यामुळे खुंटकाडीमध्ये असलेले रूटींग इन्हिबीटरचे वहन (लीचींग) होईल व काडी लवकर फुटण्याकरीता मदत होईल.


काडी तयार करणे


काड्यांचे बंडल तयार करणे